# घराणे क्रमांक २९ पंचनदी-कोहीळ

या घराण्याचा ज्ञात मूळ पुरुष गोविंद. हे घराणे मूळचे पंचनदीचे. गोविंद व प्रभाकर हे दोन सख्खे बंधु कोंकणातून कोहीळ येथे येऊन स्थायिक झाले. सध्या याचे वास्तव्य कल्याण, बदलापूर येथे आहे.

**कुलस्वामी -** कोळथरे येथील कोळेश्वर.

**कुलधर्म -** या घराण्यात वार्षिक नैवेद्य नाहीत.

**कुलाचार -** शारदीय नवरात्रात अखंडदीप आणि जोडमाळ असते. ललितापंचमीस दोन ब्राह्मण व दोन सुवासिनींना भोजन असते. मंगलकार्यानंतर बोडण आणि गोंधळ असतो. अनंत चतुर्दशी आणि ललितापंचमी ही वैयक्तिक व्रते असतात.

या घराण्यास वतन नाही.

या घराण्यात एकूण पिढ्या -- एकूण व्यक्ति -- आणि जिवंत व्यक्ति -- आहेत.

१ गोविंद - हे व प्रभाकर दोघे सख्खे बंधू कोंकणांतून कोहीळ येथे येऊन स्थायिक झाले.

१ प्रभाकर - हे व गोविंद दोघे सख्खे बंधू कोंकणांतून कोहीळ येथे येऊन स्थायिक झाले.

२ जनार्दन गोविंद - मृत्यु सुमारे सन १८९०. हे दत्तक आले. पूर्वीचे नाव कृष्णाजी भास्कर खरे रा. कोहीळ (कर्जत). कोहीळ येथे शेती करीत. शरीर सामर्थ चांगले होते. भार्या लक्ष्मी. मृ.स. १९२०. (कु. सई) पिता दिनकर परशुराम जोशी, कोहीळ. अपत्ये १ कन्या १ पुत्र.

३ कु. येसू जनार्दन गोविंद - भ्र. धोंडोपत गांगल रा. कोहीळ.

३ विनायक जनार्दन गोविंद - ज.स. १८८४. शिक्षण मराठी ६ वी. मुरबाड तालुक्यातील तलाठी होते. निवृत्तीनंतर वास्तव्य कल्याण येथे गीता ज्ञानेश्वरी  इत्यादि ग्रंथ पठणात काळ घालविला. भार्या सरस्वती. ज.स. १८९१. (कु. दुर्गा) पिता बाळाजी गणेश काळे (वत्स) पुणे. अपत्ये ५ कन्या १ पुत्र.

४ कु. यमुना विनायक जर्नादन - ज.स. १९१४. (रुक्मिणी) भ्र. विनायक महादेव वेलणकर रा. वरंध महाड.

४ कु. सीता विनायक जनार्दन - (सरस्वती) भ्र. मोरेश्वर निलकंठ वैद्य रा. कराडे-पनवेल.

४ कु. सोनू विनायक जनार्दन - ज.दि. २०/९/१९२८. मराठी ५ वी.

४ कु. इंदू विनायक जनार्दन - ज.स. १९३० मराठी ६ वी.

४ कु. द्रौपदी विनायक जनार्दन - ज.स. १९३२. मराठी २ री.

४ श्रीधर विनायक जनार्दन - ज.दि. १९/११/१९२०. मराठी ७ वी व इंग्रजी ४ इयत्ता. बदलापूर येथे गोरक्षण संस्थेत नोकरी.